# माण देशी महिला सहकारी बँक लि.म्हसवड, ता. माण जि.सातारा

रजि.नं.- एस .ए.टी/माण/बी.एन.के./ओ./119, सन 1996 दि.31.10.1996

## तेविसावी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदांकरिता)**

माण देशी महिला सहकारी बँक लि . म्हसवड बँकेच्या सर्व सभासदांना विनंतीपुर्वक कळविणेत येते की,आपल्या बँकेची तेविसावी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि . 27 मार्च 2021 रोजी दुपारी 12 वा . माण देशी महिला सहकारी बँक लि., म्हसवड च्या मुख्य कार्यालय,माण देशी चौक,म्हसवड -415509 येथे बॅकेच्या अध्यक्षा मा. श्रीमती चेतना सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली दूरचित्रवाणीद्वारे (व्हिडिओ कॉन्फरन्स)ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहे. तरी पाठविलेल्या लिंकच्या माध्यमातून आपण सभेत सहभागी व्हावे, हि नम्र विनंती.

**- सभेपुढील विषय -**

1. दि .14 . 09 . 2019 रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
2. दि. 31 मार्च 2020 अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा ताळेबंद व नफा तोटा पत्रक वाचून स्वीकृत करणे .
3. दि. 31 मार्च 2020 अखेरच्या मा . संचालक मंडळाने मंजुर केलेल्या नफा विभागणीस कार्योत्तर मंजुरी देणे.
4. सन 2020-2021 सालच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे व सन 2019-2020 मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देणे.
5. सन 2019-2020 चे शासकीय लेखापरिक्षण अहवाल व त्याचा दोष दुरूस्ती अहवाल वाचून नोंद घेणे.
6. मा. संचालक मंडळाने सन 2020-2021 करिता नियुक्त केलेल्या वैधानिक लेखापरिक्षक नेमणूकीस व त्यांच्या मेहनतानास कार्योत्तर मंजुरी देणे .
7. मा . संचालक मंडळाने सन 2020-2021 करिता नियुक्त केलेल्या अंतर्गत लेखापरिक्षक नेमणूकीस व त्यांच्या मेहनतानास कार्योत्तर मंजुरी देणे.
8. मा . संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
9. मा. संचालक मंडळाने शिफारस केलेले पोट नियम दुरूस्तीस मंजूरी देणे.
10. माण देशी महिला सहकारी बँक व माण देशी फौंडेशन यांच्या संयुक्त विदयमाने राबविलेल्या उपक्रमांची चर्चा करून नोंद घेणे.
11. वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थीस मान्यता देणे.
12. मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे .

स्थळ - म्हसवड

दिनांक- 05 मार्च 2021

मा.संचालक मंडळाच्या आदेशानुसार

RKulkarni

(सौ. रेखा कुलकर्णी)

मुख्य कार्यकारी अधिकारी

**विशेष सुचना -**

1. गणपुर्ती अभावी सभा तहकुब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर सभा घेणेत येईल . त्या सभेस गणपुर्ती ची आवश्यकता असणार नाही .
2. बॅकेचा सन 2019-2020 अखेरचा लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेला ताळेबंद,नफा तोटा पत्रक व लेखापरीक्षक प्रमाणपत्र दिनांक 28 सप्टेंबर 2019 रोजीच्या " **दैनिक ऐक्य**" मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहे .
3. बँकेचा 31.03.2020 अखेरचा 23 वा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक हे बँकेच्या नोंदणीकृत मुख्य कार्यालय व सर्व शाखांच्या नोटीस बोर्डावर तसेच बँकेच्या वेबसाईट www.manndeshibank.com वर प्रसिद्ध करण्यात आला आहे. तरी सभासदांना विनंती की, प्रसिद्ध केलेला अहवाल नजीकच्या शाखेत अथवा वेबसाईटवर पहावा .
4. ज्या सभासदांना बँकेच्या कामकाजासंबंधी काही माहिती विचारावयाची असेल तर त्यांनी आपल्या सुचना बँकेचा ईमेल आयडी info@manndeshibank.com यावर दि. 20 मार्च 2021 पुर्वी बँकेकडे पाठवाव्यात .
5. कोविड 19 या वैश्विक महामारीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या दि .25.02.2021 च्या परिपत्रकान्वये सदर सभा दूरचित्रवाणीद्वारे (व्हिडिओ कॉन्फरन्स)ऑनलाईन पध्दतीने घेण्याच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वरीलप्रमाणे आपल्या बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा दुरचित्रवाणीद्वारे (व्हिडिओ कॉन्फरन्स)ऑनलाईन पध्दतीने आयोजित करण्यात आली आहे.
6. या दूरचित्रवाणीद्वारे (व्हिडिओ कॉन्फरन्स)ऑनलाईन पध्दतीने होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेची दिनांक, वेळ याबाबतची माहिती एसएमएस/ईमेल/व्हॉट्सॲप व्दारेही कळविण्यात येईल .
7. ज्या सभासदांनी आपला ईमेल आयडी , मोबाईल नंबर बँकेकडे कळविलेला नाही त्या सभासदांनी त्याची माहिती बँकेचा ईमेल आय डी info@manndeshibank.com व ग्राहक सुविधा कमांक 9423807894 यावर एस . एम. एस./व्हॉटसॲप व्दारे दिनांक 24 मार्च 2021 पर्यंत पाठविण्यात यावे.
8. वर नमूद मुददा क्र.7 व्यतिरिक्त , आपणास सदर दूरचित्रवाणी (व्हिडिओ कॉन्फरन्स)ऑनलाईन पध्दतीने होणा-या सभेची नोटीस प्राप्त होताच आपण आपला मोबाईल क्रमांक, ईमेल आयडी रजिस्टर केल्याची खातरजमा करावी, नसल्यास आपण आपली माहिती आपल्या ओळखपत्रासह ,सभासद प्रमाणपत्र किंवा सभेची नोटीस सोबत घेवून आपल्या नजीकच्या शाखेमध्ये कार्यालयीन वेळेत व सार्वजनिक सुट्टया वगळता दिनांक. 24 मार्च 2021 पर्यंत समक्ष येऊन आपले नाव,मोबाईल नंबर व ईमेल आयडी यासह रजिस्टर करू शकता .
9. वरीलप्रमाणे बँकेकडे रजिस्टर असलेल्या व नव्याने रजिस्टर झालेल्या सर्व सभासदांना त्यांच्या मोबाईल क्रमांकावर व ई मेल आयडी वर दूरचित्रवाणीद्वारे (व्हिडिओ कॉन्फरन्स)ऑनलाईन पध्दतीने होणा-या आपल्या बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभेची लिंक 25 मार्च 2021 पासून पुढे सभेपुर्वी पाठविली जाईल .
10. बँकेच्या ज्या सभासदांनी यापुर्वी आपले ईमेल आयडी ,मोबाईल नंबर रजिस्टर केले असतील त्या सभासदांना त्यावर वार्षिक सभेची लिंक पाठविली जाईल . जर सभासदांनी आपला मेल आयडी,मोबाईल नंबर बदलला असलेस तो मेलव्दारे/एसएमएस व्दारे किंवा प्रत्यक्ष नजिकच्या शाखेत जाऊन अपडेट करावा .
11. कृपया प्रस्तुतच्या नोटीसचे सभासदांनी काळजीपूर्वक वाचन करावे. सभेत डिजीटल पध्दतीने सभेतील ठरावांवर मतदान घेण्यात येईल.